# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

### कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 204
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : गुरूवार, दिनांक 16 ऑक्टोबर 2025
**(Day and Date )** : Thrusday, 16 October 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## 204 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 204 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने गुरूवार, दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. डॉ. अक्षया निकुंभ, मुंबई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 09 | मा. श्री. प्रसेनजित श्रीकृष्णा फडणवीस, पुणे | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 10 | मा. डॉ. दत्तात्रय मनोहर गुजराथी, नाशिक | | सदस्य |
| 11 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 12 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 13 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 14 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, प्र-कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

- पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**व्यवस्थापन मंडळ बैठक**
**Board of Management Meeting**
कार्यवृत्त (**Minutes of the Meeting**)

गुरूवार, दिनांक 16 ऑक्टोबर 2025 वेळ – सकाळी 11.30 वाजता
Thrusday, 16 October 2025 **Time : 11.30 am**

| अनु.क्रमांक Subject No. | | तपशील Details |
|---|---|---|
| 204.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.<br>तसेच मा. राज्यपाल महोदयांनी नामनिर्देशित केलेल्या 3 सदस्यांपैकी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या डॉ. दत्तात्रय मनोहर गुजराथी यांचे विद्यापीठाची शाल व विद्यापीठातील आंब्याचे रोप देऊन मा. कुलगुरूंनी स्वागत केले.<br>ऑनलाईन उपस्थित असलेल्या मा. डॉ. अक्षया निकुंभ आणि मा. श्री. प्रसेनजित श्रीकृष्णा फडणवीस यांचे मा. कुलगुरू तथा बैठकीचे अध्यक्ष यांनी स्वागत केले. |
| | | सभेला सुरुवात करण्यापूर्वी मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळ यांनी विद्यापीठाच्या कामकाजाविषयी आणि सद्यस्थितीतील विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा सांगितला.<br>1. दूरशिक्षण परिषदेने दिलेल्या मुदतीत विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत चार लक्ष पर्यंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी प्रवेशाकरिता नोंदणी केलेली आहे. त्यांपैकी 143000 विद्यार्थ्यांनी विविध शिक्षणक्रमांच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश नोंदवला आहे. यासाठी विविध माध्यमांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी विद्यार्थी सेवा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली आहे.<br>2. परीक्षा मंडळाने या शैक्षणिक वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक प्रकाशित केले आहे. मागील सर्व परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. या वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका असल्याने वेळापत्रकात त्यानुसार बदल होऊ शकतो. परंतु सर्व वेळापत्रक परीक्षा विभागाने तयार केले आहे. |

3. मागील महिन्यात बोटस्वाना या देशात झालेल्या Common Wealth of Learning च्या 3 दिवसीय कार्यशाळेसाठी सहभाग नोंदवला. या कार्यशाळेत जगभरातील दूरशिक्षणात काम करणाऱ्या सर्व मुक्त विद्यापीठांच्या कुलगुरूंचा समावेश होता. या कार्यशाळेत 'Best Practices of YCMOU in ODL' या विषयावर सादरीकरण केले. त्यातून विविध विद्यापीठांनी वेगवेगळ्या गोष्टींसाठी भविष्यात विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्याची तयारी दर्शविली. University of Zambiya या झांबियन विद्यापीठाबरोबर Computer Science आणि English Education या संदर्भातील सामंजस्य करार करण्यात आला.

4. आयकर विभागाकडून दरवर्षी आपल्याकडून नफा मिळवणारी संस्था म्हणून आयकर आकारला जातो. आयकर विभागाकडून आपल्याकडून वसूल केलेली आयकराची रक्कम पायाभूत सुविधांसाठी वापरण्याबाबत आदेशित करण्यात येते. त्या धर्तीवर या रकमेतून वेगवेगळ्या ठिकाणी पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत.

5. मा. उच्चशिक्षण मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांचेशी झालेल्या बैठकीत विद्यापीठातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्याकरिता स्वतंत्र बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आढावा शासन निर्णय परिपत्रक व अधिसूचना यामध्ये विद्यापीठाचे नाव शासनाकडून नमूद होणे, विद्यापीठाचे स्वतंत्र डेटा सेंटर स्थापित करणेसाठी निधी मिळणे, कुलगुरू व इतर सर्व संवैधानिक अधिकाऱ्यांच्या सेवा सातत्य, वेतन निश्चिती, रजा रोखीकरणबाबतचे प्रकरणे निकाली काढणे, सातव्या वेतन आयोगात संवैधानिक पदांचा शासन निर्णय निर्गमित करणे, कर्मचाऱ्यांचे रोस्टर अंतिम करणे, विद्यापीठ ग्रंथालयाचे ज्ञानस्त्रोत केंद्र असे नामकरण करणे, वर्धा येथील विद्यापीठाचे विभागीय केंद्र व व्यावसायीक कौशल्य केंद्राकरिता निधी उपलब्ध करून देणे व महाज्ञानदिप प्रकल्पाचा सविस्तर आढावा इत्यादी बाबींवर सविस्तर चर्चा झाली. मा. मंत्री महोदय यांनी विद्यापीठाचे सर्व प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन देऊन संबंधीत विभागांस या प्रश्नांच्या अनुषंगाने दर 15 दिवसांनी एक स्वतंत्र बैठक घेण्याचेही मंत्रालयीन कर्मचाऱ्यांना निर्देश दिले. यामध्ये विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध सादर करून त्यानुसार प्रस्ताव करण्याविषयी सुचना केल्या. तसेच सुधारीत आकृतिबंधाचे काम चालू केले आहे.

6. वर्धा येथे वर्धा व भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकाराने विद्यापीठाला 10 एकर शासनाची जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेवर विद्यापीठाचे विभागीय केंद्र व कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यासाठी सुसज्ज इमारती

| | | |
|---|---|---|
| | | बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरिता शासनाकडून निधी प्राप्त होण्यासाठी विद्यापीठाने वर्धा व भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. डॉ. पंकज भोयर यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. निधी उपलब्ध करून देण्याबाबत त्यांच्याकडे दिलेल्या प्रस्तावावर मंत्रालयीन स्तरावर मा. उच्चशिक्षण मंत्री व मा. मुख्यमंत्री कार्यालय यांच्याकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक शिफारसी झालेल्या आहेत. |
| | | 7. वाशिम जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी 2 एकर जागा विद्यापीठाच्या जिल्हा केंद्रासाठी दिली आहे. तेथेही जिल्हा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.<br>8. या पावसाळ्यात विद्यापीठाने 500 नवीन झाडांचे रोपण करण्याचा संकल्प केला होता. त्यांपैकी 450 झाडांचे रोपण विद्यापीठाने केले आहे.<br>9. पाणी साठवण व उपाययोजना तसेच कचरा व्यवस्थापनासाठी मुंबईच्या **I.I.T.** यांची मदत घेण्यात येत आहे.<br>10. कुलसचिव श्रीयुत दिलीप भरड यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणासाठी राजीनामा दिल्यामुळे सध्या विद्यापीठाचे वित्त अधिकारी डॉ. कतलाकुटे यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.<br>11. विद्यापीठाच्या मा. राज्यपाल नामनिर्देशित विविध क्षेत्रातील 3 तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन मा. राज्यपाल कार्यालयाकडून करण्यात आले आहे. संशोधन क्षेत्रातून **I.I.T.** मधून अक्षया निकुंभ, वाणिज्य व व्यवस्थापन आणि सहकार क्षेत्रातून डॉ. दत्तात्रय गुजराथी, आणि तिसरे तज्ज्ञ उद्योग क्षेत्रातील डॉ. प्रसेनजित फडणवीस यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. या तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा विद्यापीठाच्या प्रगतीत उपयोग होणार आहे ही आनंदाची बाब आहे.<br>अशा प्रकारे विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे असे मा. अध्यक्ष तथा कुलगुरू यांनी अवगत करून दिले. त्यावर सर्व सन्माननीय सदस्यांनी समाधान व्यक्त केले. |
| 204.2 | 204.2.1 | **दिनांक 8 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या 203 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : दिनांक 8 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या 203 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव डॉ. कतलाकुटे यांनी वाचून दाखविले. इतिवृत्तातील पृष्ठ क्रमांक 8 वरील अंकेक्षण अहवालाला जोडूनच संमंत्रकांच्या तासिका तत्वावरील दराबाबतच्या समितीचा उल्लेख आलेला आहे. सदर दोन्ही विषय वेगवेगळे असल्याने पहिला अंकेक्षण अहवालाच्या विषयाच्या ठरावानंतर वेगळा परिच्छेद करण्याची सुचना करण्यात आली व सुचनेसह इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 204.2.2 | **दिनांक 8 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या 203 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 8 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या 203 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीच्या कार्यवाहीचा अहवाल सचिव डॉ. कतलाकुटे यांनी वाचून दाखविला. कार्यवाहीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 204.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 204.3.1<br>सभा व दप्तर कक्ष | **दि. 29 जुलै व 11 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळ बैठक क्र. 46 चे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी :** दि. 29 जुलै 2025 रोजी 46 वी नियोजन मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीची पुरवणी बैठक दि. 11 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. या दोन्ही दिवसांच्या आयोजित 46 व्या नियोजन मंडळाचे एकत्रित इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 29 जुलै 2025 झालेल्या नियोजन मंडळाच्या 46 व्या आणि दि. 11 ऑगस्ट 2025 रोजी झालेल्या नियोजन मंडळाच्या 46 व्या आणि पुरवणी बैठकीचे कार्यवृत्त सचिव यांनी वाचून दाखविले. सदर इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>विद्यापीठाचा दशवार्षिक बृहत् आराखडा पाठविण्यात यावा अशी सुचना करण्यात आली. तसेच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करून बृहत् आराखडा अंतिम करण्यात येईल. |
| | 204.3.2<br>RPL Centre | **YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning (RPL Policy) स्थापन करणेबाबत मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** : विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी पूर्व कौशल्य व अनुभवाद्वारे काही पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांमध्ये क्रेडिट पॉईंटची सूट देण्याची तरतूद त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये दिली आहेत. तसेच पूर्वी मिळविलेल्या कौशल्यांचे अभ्यासक्रमातील उद्दिष्टांशी संलग्न करून पदवी शिक्षणक्रमांसाठी प्रवेश देण्यास पात्र ठरू शकतो त्याकरिता YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning (RPL Policy) करण्यास मा. नियोजन मंडळ बैठक क्र. 46 मध्ये 46.4.1 नुसार सदर कार्यपद्धतीस मान्यता दिलेली आहे तसेच मा. नियोजन मंडळ बैठक क्र. 46 मध्ये 46.4.2 नुसार Establishment of RPL Assessment Centre स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे.<br>YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning (RPL Policy) आणि RPL Assessment Centre स्थापन करण्याच्या कार्यपद्धतीस मा. नियोजन मंडळाने |

मान्य केलेल्या प्रस्तावास तसेच मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : नियोजन मंडळाच्या दि. 11 ऑगस्ट रोजी झालेल्या 46 व्या पुरवणी बैठकीत नियोजन मंडळाचे सदस्य असलेल्या डॉ. राम ठाकर यांनी ही संकल्पना मांडली. RPL ह्या संकल्पनेची माहिती बैठकीचे अध्यक्ष तथा मा. कुलगुरू यांनी सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिली.

ही संकल्पना अतिशय स्तुत्य असून ह्याची पुस्तिका सर्व सन्माननीय सदस्यांना पाठवावी अशी सुचना करण्यात आली. या संकल्पनेबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी काही सुचना असल्यास कळविण्यात याव्यात. त्यांच्या सुचनांचाही या कार्यपद्धतीत समावेश करण्यात येईल असे मा. कुलगुरूंनी विषद केले.

YCMOU Policy and Procedure for Recognition of Prior Learning (RPL Policy) या कार्यपद्धतीला सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

तसेच यासाठी RPL Assessment Centre स्थापन करण्यासही सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

204.3.3 सभा व दप्तर कक्ष

**व्यवस्थापन मंडळ ठराव 203.3.4 च्या ठरावाच्या सुधारणेस मंजुरीबाबत...**

**टिपणी** : मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 203.3.4 नुसार - मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्रमांक 196.3.2मध्ये नमूद केल्यानुसार या वर्षात वेगळी 10% वाढ न करता मागील ठरावाचीच अंमलबजावणी करून पुढीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते मान्यता प्रदान केली.

| अ.क्र. | प्रकार | रक्कम | 10 टक्के वाढीसह |
|---|---|---|---|
| 01 | नियमित शिक्षक/ शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी | 35,000/- | 38,500/- |
| 02 | करारावरील अधिकारी व कर्मचारी | 30,000/- किंवा प्रत्यक्ष घेत असलेले दहमहा एकत्रित वेतन यापैकी जी कमी असेल ती रक्कम | **रु. 30,000/- किंवा प्रत्यक्ष वेतन घेत असलेल्या रकमेत 10 टक्के वाढ करून जी कमी असेल ती रक्कम** |
| 03 | दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी | 10,000/- | 11,000/- |

तसेच ठराव क्रमांक 196.3.2 मध्ये नमूद केल्यानुसार मागील वर्षापासून पुढील तीन वर्षांनी सानुग्रह अनुदानात वाढ करता येईल असेही नमूद केले.असा ठराव झालेला आहे.

| | | |
|---|---|---|
| | | मात्र सदर ठरावात अ.क्र. 1 मध्ये नियमित वेतनश्रेणीतील शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी आणि क्र. 2 मध्ये करारावरील वेतनावरील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी असा उल्लेख अपेक्षित होता. त्याप्रमाणे सदर प्रस्तावात दुरूस्ती करण्यास व सुधारित ठराव करणेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मंजुरीस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 203.3.4 मधील तक्त्यातील क्रमांक 02 मध्ये करारावरील वेतनावरील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी असा उल्लेख करून सुधारित ठराव करून करारावरील शिक्षकांनाही सानुग्रह अनुदान देण्यात यावे याला सर्वानुमते अनुमोदन दिले व ठराव पारीत करण्यात आला. |
| | 204.3.4<br>सभा व दप्तर कक्ष | **विद्यापीठ कायदा, परिनियम व अध्यादेश सुधारणासमिती बरखास्त करण्यास मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णयानुसार कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्व विद्यालाय विद्यापीठ अधिनियम 1997, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम 1989, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड अधिनियम 2014 आणि सीईओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ पुणे अधिनियम 2022 या विद्यापीठांच्या अधिनियमांमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यासाठी एक उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.<br>शासनाने उच्चस्तरीय समिती स्थापन केल्याने मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 187.3.13 नुसार मान्य केलेल्या आणि मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेल्या विद्यापीठ, कायदा, परिनियम व अध्यादेश सुधारणा समिती मा. व्यवस्थापन मंडळाच्या अधिन राहून बरखास्त करण्यास मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळ यांनी मान्यता दिलेली आहे. सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : शासनाने वर उल्लेखिलेल्या 4 विद्यापीठांच्या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 187.3.13 नुसार विद्यापीठाच्या अधिनियमांमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी डॉ. माळी सरांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. विद्यापीठाने गठीत केलेल्या आणि शासनाने 4 विद्यापीठांसाठी गठीत केलेल्या उच्च स्तरीय समितीचे कामकाज एकाच प्रकारचे असल्याने विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने गठीत केलेली समिती मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने बरखास्त करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. तसेच विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीतील सर्व सन्माननीय सदस्यांना याबाबत अवगत करण्यात यावे असे सुचविले. तथापी शासनाने नेमलेल्या समितीसमोर विद्यापीठ कायद्याचा सुधारीत मसुदा तयार करून ठेवण्यासाठी विद्यापीठ अंतर्गत समिती गठीत करून मसुदा करण्यात यावा असे ठरविण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 204.3.5<br>वित्त विभाग | **विद्यापीठाला वर्धा येथे मिळालेल्या जागेवर विभागीय कार्यालय व व्यावसायिक कौशल्य विकास केंद्र, वर्धा येथील शैक्षणिक परिसरात भौतिक व शैक्षणिक विकास कामास शासनाकडून निधी उपलब्ध करून देणेबाबत...**<br>**टिपणी** : वर्धा जिल्हा व एकूणच विदर्भाच्या शैक्षणिक अनुशेष भरून काढण्याच्या आपल्या संकल्पनेतून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास वर्धा येथे 10 एकर जागा शासनाकडून उपलब्ध झालेली आहे. सदर जागेवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र व व्यावसायिक कौशल्य विकास केंद्र उभारणीकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यात खालीलप्रमाणे दोन टपप्यात सुविधा निर्माण करण्याकरिता विद्यापीठात 40 कोटीची तरतूद करण्यास व शासनाकडून 145 कोटी निधी असे एकूण रु. 185/- कोटीची निधीची विद्यापीठास आवश्यकता आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील इमारतीसाठी विद्यापीठ रु. 25 कोटी व दुसऱ्या टप्प्यात 15 कोटी असे एकूण 40 कोटी खर्चाची तरतूद करणे व उर्वरित निधी पहिल्या टप्प्यात रु. 90/- कोटी व दुसऱ्या टप्प्यात रु. 55/- कोटी असे एकूण 145/- कोटी शासनाकडून मागणी करणेबाबतचा प्रस्ताव मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने शासनास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव व माहितीस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : विद्यापीठाला शासनाकडून मिळालेल्या एकूण 10 एकर जागेवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र व कौशल्य विकास केंद्र सुरू करणे, हे विद्यापीठाच्या व वर्धा जिल्हा तसेच एकूण विदर्भाच्या शैक्षणिक अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने हिताचे व महत्वाचे असल्याचे मत मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केले.<br>त्यानुसार वित्त विभागाने खालीलप्रमाणे दोन टपप्यात सुविधा निर्माण करण्याकरिता विद्यापीठात 40 कोटीची तरतूद करण्यास व शासनाकडून 145 कोटी निधी असे एकूण रु. 185/- कोटीची निधीची विद्यापीठास आवश्यकता आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील इमारतीसाठी विद्यापीठ रु. 25 कोटी व दुसऱ्या टप्प्यात 15 कोटी असे एकूण 40 कोटी खर्चाची तरतूद करणे व उर्वरित निधी पहिल्या टप्प्यात रु. 90/- कोटी व दुसऱ्या टप्प्यात रु. 55/- कोटी असे एकूण 145/- कोटी शासनाकडून मागणी करणेबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>त्याचप्रमाणे मा. कुलगुरू महोदय यांनी वरीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यास दिलेल्या मान्यतेस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 204.3.6<br>वित्त विभाग | **दि. 15 ऑक्टोबर 2025 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : दि. 15 ऑक्टोबर 2025 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : वित्त समिती बैठक क्र. 24-2025-26 दि. 15.10.2025 रोजी |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या इतिवृत्तावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वस्तर चर्चा होऊन ठराव क्र. 1,2,3,4,5,6,7,8,9,10,12 व 13 आणि ऐनवेळचे विषय क्र. 1, 2 व 3 या विषयास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>**वित्त समिती बैठकीतील ठराव क्र. 11 :** मा. कुलगुरू यांनी EBSCO च्या वरील 2 डेटाबेसचे नुतनीकरण खर्चास वित्त समिती आणि व्यवस्थापन मंडळ सभेच्या मान्यतेच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून सदरच्या विषयास व रू. 23,18,023/- (रूपये तेवीस लक्ष अठरा हजार तेवीस फक्त) इतक्या खर्चास सर्वानुमते मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 204.3.7<br>आस्थापना कक्ष | **प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदाकरिता सन 2025 दिपावली निमित्त सानुग्रह देणेबाबत...**<br>**टिपणी :** मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 203.3.4 नुसार नियमित वेतनश्रेणीतील शिक्षक/शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी आणि करारावरील वेतनावरील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच दैनंदिन वेतनावरील कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांना सानुग्रह देण्यास मान्यता दिलेली आहे.<br>सन 2025 करिता मानधन तत्वावर असलेल्या नियुक्त्यांसाठी सानुग्रह अनुदान देण्याबाबत स्पष्टता नसल्यामुळे विद्यापीठात सध्या कार्यरत असलेले Professor of Practice पदावरील व्यक्तींची नियुक्ती ही मानधन तत्वावर असल्यामुळे या नियुक्त्यांना दिवाळी सानुग्रह देण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या मानधनांवर नियुक्त केलेल्या व्यक्ती विद्यापीठासाठी काम करतात. त्यांच्या अनुभवाचा, संबंधित क्षेत्रांतील कौशल्यांचा विद्यापीठासाठी उपयोग होतो. सबब प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या मानधनांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींना सानुग्रह अनुदान देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली व ठराव पारीत करण्यात आला. |
| | 204.3.8<br>आस्थापना कक्ष | **श्री. प्रविण शंकरराव सुर्वे, संयोजक (तांत्रिक), परीक्षा विभाग (संगणक केंद्र) यांच्या करारावरील पुर्ननियुक्तीबाबत....**<br>**टिपणी :** विद्यापीठात करारावर एकत्रित वेतनावर मनुष्यबळ नियुक्त करताना खालील परिनियम व कायद्यातील तरतुदींचा आधार घेतला जातो.<br>1. विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार मा. कुलगुरूंना कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत नियुक्त्यांचे अधिकार आहेत. (सोबत कायद्याची प्रत जोडलेली आहे.)<br>2. विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते. (सोबत परिनियमाची प्रत जोडलेली आहे.) |

| क्र | नाव व पद | नेमणुकीचा कालावधी | वर्षे | शिल्लक कालावधी | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **श्री. प्रविण शंकरराव सुर्वे**<br>संयोजक (तांत्रिक)<br>परीक्षा विभाग (संगणक केंद्र)<br>जन्मतारीख 16.07.1963 | दि. 18.08.2021 ते दि. 17.02.2022<br>दि. 23.02.2022 ते दि. 22.08.2022<br>**एकूण कालावधी 20 (9 C) नुसार**<br>दि. 15.09.2022 ते दि. 14.03.2023<br>दि. 20.03.2023 ते दि. 19.09.2023<br>**एकूण कालावधी 20 (9 C) नुसार**<br>दि. 27.09.2023 ते दि. 26.03.2024<br>दि. 01.04.2024 ते दि. 30.09.2024<br>दि. 01.10.2024 ते दि. 31.03.2025<br>दि. 02.04.2025 ते दि. 01.10.2025<br>**एकूण कालावधी 11 (2 of 1993) नुसार** | 6 महिने<br>6 महिने<br>**1 वर्षे**<br>6 महिने<br>6 महिने<br>**1 वर्षे**<br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>6 महिने<br>**2 वर्षे** | विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) नुसार मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने 1 वर्ष कालावधी शिल्ल क आहे. | रू. 25000/-<br>रू. 35000/- |

श्री. प्रविण शंकरराव सुर्वे, संयोजक (तांत्रिक) यांना पूर्वीच्याच अटी व शर्तीवर रू. 35,000/- या एकत्रित वेतनावर पुढील 1 वर्ष (6 महिने - 6 महिने) कालावधीसाठी नियुक्तीबाबत मा. कुलगुरू महोदय यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

**श्री. प्रविण शंकरराव सुर्वे, संयोजक (तांत्रिक) यांच्या पुनर्नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** सदर विषय हा नियमित असून विद्यापीठ परिनियमात नमूद केलेल्या पूर्वीच्याच अटी व शर्तीच्या आधारे श्री. प्रवीण शंकरराव सुर्वे, संयोजक (तांत्रिक) यांच्या पुनर्नियुक्तीस सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

204.3.9
परीक्षा विभाग

**विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना यशकार्डचे वितरण प्रातिनिधिक स्वरूपात करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

**टिपणी :** विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक अंतर्भूत माहिती कायमस्वरूपी एकाच स्मार्ट कार्ड उपलब्ध व्हावी याद्दष्टीने विद्यापीठाने "Sapphirus Systems Pvt. Ltd. Hyderabad" यांचेशी करार केलेला असून या कराराअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना यशकार्ड वितरित केले जाणार आहे.

त्याचाच प्रथम टप्पा म्हणून सध्या प्रातिनिधिक स्वरूपात 1054 इतके यशकार्ड प्राप्त झालेले आहेत. याकरिता सदर कंपनीने मोबाईल ॲप विकसित केले असून या मोबाईल ॲपच्या माध्यमातून सर्व सेवा विद्यार्थ्यांना उपलब्ध असणार आहेत. सदर यशकार्डवर असलेल्या **Block Chain** वर आधारित **QR Code** स्कॅन केल्यानंतर व मोबाईल ॲपमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचे **Digital Wallet** मध्ये सर्व शैक्षणिक माहिती व कागदपत्रे उपलब्ध असणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते दीक्षान्त समारंभापर्यंतची सर्व शैक्षणिक स्वरूपाची माहिती उपलब्ध असणार आहे.

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या 'यशकार्ड' प्रणालीचे सादरीकरण "Sapphirus Systems Pvt. Ltd. Hyderabad" च्या प्रतिनिधींनी मा. व्यवस्थापन मंडळात सादर करून सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले. यासाठी मोबाईल ॲप तयार करण्यात आले आणि एका क्लीकवर विद्यार्थ्याला त्याच्या विद्यापीठातील शैक्षणिक सेवां संबंधित सर्व माहिती त्याला उपलब्ध होईल या संकल्पनेबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्यांनी मा. कुलगुरू आणि

| | | |
|---|---|---|
| | | पूर्ण टीमचे अभिनंदन केले.<br>"Sapphirus Systems Pvt. Ltd. Hyderabad" या संस्थेकडून 1054 कार्ड प्राप्त झाले आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांच्या अनुमतीने प्रातिनिधिक 10 विद्यार्थ्यांना या कार्डचे वितरण मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेत वितरित करण्यात आले. तसेच परीक्षा विभागास असेही निर्देश दिले की, सदर कार्डच्या अनुषंगाने संबंधीतास संपुर्ण माहिती उपलब्ध करून देऊन कार्ड विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक स्वतंत्र स्पीड पोस्ट यंत्रणा राबवून सदर कार्यवाही पुर्ण करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |
| 204.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 204.4.1<br>आस्थापना कक्ष | **Skill Entrepreneurship, Placement and Training या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीची Professor of Practice (PoP) म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : मा. व्यवस्थापन मंडळ सभा क्रमांक 202, दि. 12 जून 2025 रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक 202.4.5 अन्वये ॲग्रीकल्चर स्किलींग आणि स्कील एज्युकेशन या दोन क्षेत्रांतील PoP Professor of Practice (PoP) म्हणून दोन व्यक्तींची नेमणूक करण्याचा ठराव पारित करण्यात आला होता.<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत स्किल एज्युकेशनच्या माध्यमातून Skills, Entrepreneurship, Placement and Training या क्षेत्रांत विविध शैक्षणिक उपक्रम आणि प्रयोग राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासोबत रोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे हा विद्यापीठाचा प्रमुख उद्देश आहे.<br>वरील उद्दिष्टांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित क्षेत्रांतील अनुभवी, तज्ज्ञ व व्यावहारिक ज्ञान असलेल्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने *Skills, Entrepreneurship, Placement and Training* या क्षेत्रासाठी एका तज्ज्ञ व्यक्तीची Professor of Practice (PoP) ह्या पदासाठी करारावर नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.<br>आस्थापना कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार Skills, Entrepreneurship, Placement and Training या क्षेत्रातील कार्य विद्यापीठात सुरू करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीची Professor of Practice (PoP) म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव मा. कुलगुरूंना सादर केला होता.<br>यापूर्वी मा. व्यवस्थापन मंडळ सभा क्रमांक 202, दि. 12 जून 2025 रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक 202.4.5 अन्वये ॲग्रीकल्चर स्किलींग आणि स्कील एज्युकेशन या दोन क्षेत्रांतील Professor of Practice (PoP) म्हणून दोन व्यक्तींची नेमणूक करण्याच्या ठरावात सुधारणा करून Skills, Entrepreneurship, Placement & Training हे सुधारित पदनाम करण्याचे प्रस्तावित केले आहे. या सुधारीत नावानुसार दोन वेगवेगळ्या तज्ज्ञ व्यक्तींऐवजी एकाच तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्याच्या प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.... |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** : आस्थापना कक्षाने प्रस्तावित केल्यानुसार अॅग्रीकल्चर स्किलींग आणि स्कील एज्युकेशन या दोन क्षेत्रांतील Professor of Practice (PoP) ऐवजी Skills, Entrepreneurship, Training & Placement मधील **'एकाच'** तज्ज्ञ व्यक्तीची Professor of Practice (PoP) प्रस्तावित नियुक्ती करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान केली.<br>तसेच स्कील एज्युकेशनमध्ये प्रयोगांचाही समावेश होत असल्याने आस्थापना कक्षाने प्रस्तावित केलेल्या 'Skill Entrepreneurship, Training & Placement' **ऐवजी** 'Skills, Entrepreneurship, Training & Placement and Projects' असे नामकरण करण्याचे सुचित केले. |
| | 204.4.2 व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा | **व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेंतर्गत JNPA च्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या वाढवण प्रोजेक्टकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत.**<br>**टिपणी** : विद्यापीठाच्या व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेंतर्गत JNPA च्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या वाढवण बंदराकरिता प्रशिक्षण प्रकल्प राबविला जात आहे. सदर प्रकल्पासाठी निरंतर शिक्षण विद्याशाखेंतर्गत स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत विद्याशाखेकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. (सोबत प्रस्तावाची प्रत जोडली आहे.) त्यानुसार संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा यांचे नावे पंजाब नॅशनल बँकेत स्वतंत्र बँक खाते उघडणे व त्यानुषंगाने सदरचे खाते चालविण्याचे अधिकार मा. संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा यांना देणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयास्तव सादर. मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर बँक खाते उघडण्याची प्रक्रिया त्वरीत करण्यात येईल.<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेंतर्गत JNPA यांचेशी सामंजस्य करार करून JNPA यांच्या आवश्यकतेनुसार शिक्षणक्रम विकसन, अध्ययनसाहित्य व परीक्षेपर्यंतचे काम विद्याशाखेमार्फत करण्यात येईल. या प्रकल्पासाठी JNPA यांचेकडून आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. JNPA यांचेकडून येणाऱ्या आर्थिक अनुदानासाठी वेगळे बँक खाते असावे अशी मागणी डॉ. जयदीप निकम, संचालक, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा यांनी केली. यासाठी एक बँक खाते उघडणे आवश्यक असल्याने ते खाते उघडण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली.<br>या खात्यावरून सर्व व्यवहार करण्याचे अधिकार डॉ. जयदीप निकम, मा. संचालक व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा यांना देण्यात आले. तसेच सर्व खर्चाची देयके JNPA च्या स्वतंत्र यंत्रणेकडून ऑडीट करून घ्यावेत व देयकांची अदायगी करावी. यासाठी संचालक, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा आणि JNPA यांनी एक स्वतंत्र SOP तयार करून खर्चाची देयके देण्याची कार्यवाही पूर्ण करावी असे ठरले.<br>तसेच दर सहा महिन्यांनी या खात्यामार्फत होणाऱ्या सर्व Transactions चा आढावा व्यवस्थापन मंडळात सादर करून त्यांची मंजुरी घ्यावी असेही सुचित करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 204.4.3 प्रशासन विभाग | मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 202.4.6 नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989 मधील अ.क्र. 1 ते 4 अन्वये संवैधानिक अधिकारी असलेल्या कुलसचिव, वित्त अधिकारी आणि परीक्षा नियंत्रक पदांच्या वेतनश्रेणी, सेवेच्या अटी व शर्ती, निवडीची कार्यपद्धती, सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ, इत्यादींसाठी तत्कालिन परिनियमात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने केलेला ड्राफ्ट स्टॅट्युट मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर मसुद्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच सदर मसुद्यावर सन्माननीय सदस्यांकडून दुरुस्त्या 10 दिवसात मागवाव्यात. आलेल्या दुरुस्त्या मा. कुलगुरू महोदयांना सादर कराव्या. सादर केलेल्या दुरुस्त्यांपैकी मा. कुलगुरू महोदय यांनी मान्य केलेल्या दुरुस्त्या परिनियमात कराव्यात व अंतिम झालेले परिनियम मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयात मान्यतेच्या पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले होते.<br>त्यानुसार तीनही पदांचे मसुदे सर्व सन्माननीय सदस्यांना मेलद्वारे पाठविण्यात आले होते. त्यावर कोणत्याही सदस्याने अद्यापपावेतो दुरुस्त्या सुचविल्या नाहीत. त्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्रमांक 203.4.4, 203.4.5 आणि 203.4.6 नुसार मान्य झालेला मसुदा अंतिम ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |
| | | शासनाच्या डिजिटल व ऑनलाईन पध्दतीने शासनाचे कामकाज करण्याचे धोरण स्विकारले आहे या धर्तीवर मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना व संचालकांना टॅबचे वितरण करण्याचे धोरण विद्यापीठाने स्विकारले आहे. त्यानुसार उपस्थित मान्यवर सदस्यांना टॅबचे वितरण करण्यात आले.<br><br>सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या संमतीने बैठक समाप्त करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**